पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक :नस/०४/कावि/ ४४० /२०२१
दिनांक : १७/०९/२०२१

प्रति,

मा.......................................
सदस्य, महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा दि.**२३/०९/२०२१** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार**, दिनांक **२३/०९/२०२१** रोजी **दु.२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व दि.२८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण ऑनलाईन पध्दतीने सहभागी व्हावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

मा. महिला व बालकल्याण समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १७**

**दिनांक : २३/०९/२०२१** **वेळ : दुपारी २.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार**, दिनांक **२३/०९/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व दि.२८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) मा.महिला व बालकल्याण समिती सभा (**कार्यपत्रिका क्र.१६)** दिनांक **०९/०९/२०२१** चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत मनपा हद्दीतील नागरिकांकरिता विविध कल्याणकारी योजना राबविणेत येतात. त्याअनुषंगाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे WE-YUVA चॅलेंज स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुषंगाने सदर स्पर्धेची मनपा हद्दीतील मुली/युवती/महिलांमध्ये जास्तीत जास्त प्रसिद्धी व जनजागृती व्हावी जेणेकरुन जास्तीत जास्त स्पर्धकांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावा. याकरिता रेडीओ सिटी ९१.१ एफम व रेडिओ मिर्ची ९८.३ एफम या रेडिओ वाहिन्या ऐकणारा महिला प्रेक्षक वर्ग हा जास्त असलेने सदर स्पर्धेचे जाहिरातीचे कामकाज आदेश क्र.नाවियो/०२/कावि/२५/२०२१ दि.२५/०३/२०२१ अन्वये सदरचे दोन रेडिओ वाहिन्यांना देणेत आलेले आहे. सदर कामकाज पुर्ण झालेनंतर दोन्ही संस्थांनी झालेल्या कामकाजाचे बिल सादर केलेले असून ते खालील तक्त्यात नमुद केलेले आहे.

| अ. क्र. | शहर | स्टेशन | दिवस | स्पॉट्स वारंवरता | स्पॉट्स/ जाहिरात कालावधी (सेकंद) | एकुण सेकंद | दर/१० सेकंद | किंमत | एकुण रक्कम (१८% GST) सह |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे | रेडिओ सिटी ९१.१ | १० | १५ | ३० | ४५०० | ४०० | १,८०,०००/- | २,१२,४००/- |
| २ | पुणे | रेडिओ मिर्ची ९८.३ | १० | १५ | ३० | ४५०० | ४०० | १,८०,०००/- | २,१२,४००/- |

WE-YUVA चॅलेंज स्पर्धेची जाहिरातीचे कामकाज रेडिओ सिटी ९१.१ एफम व रेडिओ मिर्ची ९८.३ एफम यांनी सादर केलेल्या दरपत्रकानुसार दि.२४/०३/२०२१ पासून

दि.०२/०४/२०२१ पर्यंत (एकूण १० दिवस) तातडीची बाब म्हणुन कामकाज करणेस तसेच सदर जाहिरातीकरीता लागणारी तरतुद महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत येणा-या महिला दिन या उपलेखाशिर्षामधून खर्च करणेस आदेश देणेत आलेला असलेने तातडीची बाब म्हणून राबविलेल्या कामकाजास कार्योत्तर मान्यता देणकामी मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

(दिनांक **२३/०९/२०२१** चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

----------

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४४०/२०२१
दिनांक : १७/०९/२०२१ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.